# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** गोंदिया ग्रामीण **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0030 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/01/2021 21:29 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** रविवार
   **Date From (दिनांक पासून):** 17/01/2021
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/01/2021
   **Time From (वेळेपासून):** 14:26 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 17/01/2021 **Time (वेळ):** 21:29 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 038 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/01/2021 21:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.3 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** रिंग रोड,जिप कार्या समोर, गोंदिया,गोंदिया

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. उत्तमचंद मोहन खांडेकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1971 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

पोलीस स्टेशन, गोंदिया (ग्रा.) जि. गोंदिया

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तांडा ,गोंदिया,गोंदिया ग्रामीण ,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तांडा ,गोंदिया,गोंदिया ग्रामीण ,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7058871971

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. रामसिंह सुरजनाथसिंह बैस | | | 1. वार्ड क्र 3,फुलचूर ,गोंदिया,गोंदिया ग्रामीण ,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

पंचनामा कार्यवाही पूर्ण केल्यानंतर तक्रार दिली

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि ला.प्र.वि. गोंदिया दि.17.01.2021नांव:-श्री. उत्तमचंद मोहन खांडेकर, वय 50 वर्ष, व्यवसाय - माजी सैनीक/शेती, रा. तांडा, ता. जि. गोंदिया, मो.क्र. 7058871971, 8600590737मी दि. 17.01.2021 रोजी पोलीस उपअधिक्षक श्री. रमाकांत कोकाटे, ला.प्र. वि गोंदिया यांचे समक्ष एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने तक्रार नोंदविली. पोउपअधि. श्री. कोकाटे यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर मराठीत टंकलिखीत करुन त्याची प्रिंट आऊट काढुन त्यावर माझी सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.
मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, गोंदिया येथे समक्ष येवुन तक्रार नोंदवितो की, मी वरील पत्यावर माझे कुटुंबासोबत राहत आहे. माझ्याविरुध्द पोलीस स्टेषन गोंदिय (ग्रा.) येथे दारुविक्री, शरीरावरचे गुन्हे, कौटुंबिक भांडणतंटा व निवडणुक संबंधी गुन्हे दाखल आहेत. त्यावरुन मला सन 2013 मध्ये उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांनी गोंदिया जिल्हयातुन हद्दपार करण्याचे आदेष दिले होते. त्याविरुध्द मी उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपुर येथे अपील दाखल केला असता मा. न्यायालयाने सदर हद्दपारचे आदेष रदद् ठरविले होते. दि. 16.01.2021 रोजी श्री रामसिंग बैस, पोलीस हवालदार, पोलीस स्टेषन, गोंदिया (ग्रा.) यांनी त्यांचे मोबाईल क्र. 9588406078 वरुन माझा मोबाईल क्र. 8600590737 वर संपर्क करुन कळविले की, मा. पोलीस अधिक्षक, गोंदिया यांनी तुमच्याविरुध्द गोंदिया जिल्हयातुन हद्दपार करण्याबाबतचे आदेष पारीत केले आहेत. सदर आदेषावरुन पोलीस तुम्हाला सोबत घेवुन तुम्ही सांगीतलेल्या ठिकाणच्या पोलीस स्टेषनला सोडुन देतील. त्यामध्ये आम्ही तुम्हाला मदत करु, त्याकरीता तुम्ही रु. 10,000/- चा एक लिफाफा ठाणेदार साहेबाकरीता व माझ्याकरीता रु. 5,000/- चा एक लिफाफा असे एकुण रु. 15,000/- माझ्याकडे द्या, मी तुम्हाला सदर आदेष देतो, असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने ठीक आहे, असे बोलुन फोन बंद केला.श्री रामसिंग बैस, पोलीस हवालदार, पोलीस स्टेषन, गोंदिया (ग्रा.) यांनी माझ्याविरुध्द पारीत झालेले हद्दपारीचे आदेष माझ्याकडे देवुन त्यामध्ये मला मदत करण्याकरीता माझ्याकडे मागणी केलेली लाच रक्कम एकुण रु. 15,000/- त्यांना देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्यामुळे मी त्यांचेविरुध्द कायदेषीर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. त्यांचेशी माझे पुर्वीचे कोणतेही आर्थिक संबंध नाहीत किंवा त्यांचेषी माझे पुर्व वैमनस्य नाही. माझी तक्रार माझे सांगीतल्याप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली. त्याची प्रिंट काढुन मी वाचून पाहीली बरोबर आहे.तद्नंतर पोउपअधि. श्री. कोकाटे यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करुन पंच श्री. संतोष पुरणलाल शहारे, वनमजुर व श्री. प्रेमलाल जीवन भोयर, वनमजुर, वनपरिक्षेत्राधिकारी कार्यालय वनविभाग गोदिया, यांची ओळख आमच्यापी करुन दिली व त्यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन माझी तक्रार त्यांना वाचावयास दिली. पोउपअधि. श्री. कोकाटे यांचे सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोउपअधि. श्री. कोकाटे यांनी स्वाक्षरी केली. पोउपअधि. श्री. कोकाटे यांनी प्रथम व्हाईस रेकार्ड कशा प्रकारे काम करतो याबाबत आम्हास व पंचास सविस्तर माहीती दिली. यानंतर पोउपअधि. श्री. कोकाटे यांनी गै.

पोलीस स्टेशन,गोंदिया जि. गोंदिया (ग्रा.)

अ. श्री. रामसिंग बैस, पो.हवा, पो.स्टे. गोदिया (ग्रा.) यांच्याविरूध्दची पुढील पडताळणी कार्यवाही गै.अ. श्री. रामसिंग बैस यांच्या राहत्या घरी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर पोउपअधि. श्री. कोकाटे यांनी आम्हास व पंचास पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर वेळ 10.23 वाजता व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्र. 1 व माझ्या आवाजात पडताळणीकरीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकार्डरसह मला पंच क्र. 1 यांचेसोबत माझ्या पत्नीच्या नावे असलेल्या खाजगी चार चाकी वाहन टोयोटा इटास क्र.एम.एच/31/ डीव्ही/9444 ने गै.अ. श्री बैस यांचे फुलचुर, गोंदिया येथील राहत्या घरी जाण्यास रवाना केले. मी पंच क्र. 1 सह गै.अ. श्री बैस यांच्या फुलचुर येथील राहत्या घरी गेलो. त्याठिकाणी गै.अ. श्री. बैस हे घरी हजर नव्हते. मी घरी आल्याबाबत गै.अ. ची पत्नीने गै.अ. बैस यांना फोन द्वारे कळविले व मला घरी बसण्यास सांगीतले. थोड्यावेळाने मी सुध्दा गै.अ. श्री बैस यांना मोबाईल फोनद्वारे संपर्क केला असता त्यांनी ते घरी येत असल्याचे सांगीतले. थोड्यावेळाने गै.अ. श्री बैस हे घरी आले. त्यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी माझ्याविरुध्द पारीत झालेले हददपारीचे आदेश माझ्याकडे देवुन त्यामध्ये मला मदत करण्याकरीता रु. 10,000/- चा एक लिफाफा ठाणेदार साहेबाकरीता व स्वतःकरीता रु. 5,000/- चा एक लिफाफा असे एकुण रु. 15,000/- लाच रकमेची मागणी करुन प्राप्त करण्याच्या प्रयत्न केला. त्यानंतर मी गै.अ. श्री बैस यांच्याशी बोलणी झाल्यावर मी त्याठिकाणाहुन निघुन गेलो. यानंतर वेळ 12.03 वा. मी पंच क्र. 1 यांच्यासह ला.प्र.वि, गोंदिया कार्यालयात परत आल्यावर व्हाईस रेकार्डर पंच क्र. 1 यांच्या आवाजात बंद करण्यात आले.त्यानंतर पो.उपअधि. श्री कोकाटे यांनी पंचासमक्ष व्हाईस रेकार्डर मधील रेकार्ड झालेले संभाषण ऐकुण गै.अ. श्री. रामसिंग बैस, पो.हवा, पो.स्टे. गोदिया (ग्रा.) यांनी माझ्याविरुध्द पारीत झालेले हददपारीचे आदेश माझ्याकडे देवुन त्यामध्ये मला मदत करण्याकरीता माझ्याकडे रु. 15,000/- लाच रकमेची पंचासमक्ष मागणी करुन ती लाच रक्कम प्राप्त करण्याच्या प्रयत्न केल्याची खात्री केली. त्यानंतर पोउपअधि. श्री कोकाटे यांनी गै.अ. श्री. रामसिंग बैस यांच्याविरुध्द पुढील सापळा कार्यवाही आज रोजी करण्याचे ठरविले. त्यानंतर पोउपअधि. श्री कोकाटे यांच्या सांगण्यावरुन मी सापळा कार्यवाहीत वापरण्यात येणारी लाच रक्कम रु. 15,000/- त्यांच्याकडे जमा केली. त्यानंतर त्यांनी लाच रकमेला लावण्यात येणाऱ्या अन्थ्रासीन पावडरची वैशिष्ट सांगुन त्या नोटांना अन्थ्रासीन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक आपल्या अधिनस्थ कर्मचारी यांच्या हस्ते करुन दाखविले. त्यानंतर रू. 15,000/- दराच्या 30 चलनी नोटांना अन्थ्रासीन पावडर लावुन त्या नोटा एका पांढऱ्या लिफाफ्यात ठेवुन लिफाफ्याला बाहेरुन अन्थ्रासीन पावडर लावुन पंचासमक्ष लिफाफा बंद करुन लिफाफा अधिनिस्त कर्मचाऱ्याचे हस्ते पंचासमक्ष माझ्या फुलप्यांटच्या समोरील उजव्या बाजुच्या रिकाम्या खिश्यात ठेवल्या. त्यानंतर पो.उपअधि. श्री कोकाटे यांनी आम्हास व पंचास सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर वेळ 14.26 वा. व्हाईस रेकार्डर सुरू करून पंच क्र. 1 व माझ्या आवाजात सापळा कार्यवाहीकरीता जात असल्याचे संभाषण रेकार्ड केले व व्हाईस रेकार्डरसह मला पंच क्र. 1 यांचेसोबत माझ्या खाजगी चारचाकी वाहन टोयोटा इटास क्र. एम. एच/31/डीव्ही/9444 ने पोलीस स्टेषन गोंदिया (ग्रा.) कडे जाणाऱ्या रोडच्या लागुन असलेल्या चहा टपरीच्या दुकानाजवळ जाण्यास रवाना केले. पो.उपअधि. श्री कोकाटे हे पंच क्र. 2 व सापळा पथकातील सदस्यांसह आमचे मागो-माग आले. मी पंच क्र. 1 सह जिल्हाधिकारी, गोंदिया कार्यालया समोर, रिंग रोडच्या बाजुला श्री चंदु मेश्राम यांचे चहा/पान टपरी जवळ थांबलो. त्यावेळी सदर चहा/पान टपरी ही बंद होती. पो. उपअधि. श्री कोकाटे हे पंच क्र. 2 व सापळा पथकातील सदस्यांसह त्याठिकाणी आमच्या आजुबाजुला दबा धरून बसले. त्यानंतर मी माझे मोबाईल वरुन गै.अ. श्री बैस यांचे मोबाईलवर संपर्क करुन पोहचल्याचे कळविले. थोड्यावेळाने गै.अ. श्री बैस हे आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी आले. त्यांचेषी बोलणी दरम्यान त्यांनी माझ्याकडे रु. 15,000/- लाच रकमेची पंचासमक्ष मागणी केली. त्यावरुन मी माझे फुलपन्टचे समोरील उजव्या खिष्यात रु. 15,000/- लाच रक्कमेचा ठेवलेला लिफाफा माझ्या उजव्या हाताने काढुन गै.अ. श्री बैस यांना दिली. गै.अ. श्री बैस यांनी लाच रक्कम रु. 15,000/- लाच रक्कम ठेवुन असलेला लिफाफा डाव्या हाताने घेवुन डाव्या हाताने अंगात घातलेल्या फुलप्यांच्या समोरील डाव्या बाजुचे खिष्यात पंचासमक्ष ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास गै.अ. श्री. बैस यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा नियोजीत इषारा केला. त्याचवेळी गै.अ. श्री. बैस यांना शंका आल्याने त्यांनी रु. 15,000/- लाच रक्कमेचा ठेवलेला लिफाफा श्री चंदु मेश्राम यांचे चहा/पान टपरीवर पंचा समक्ष ठेवुन दिला. त्यानंतर सापळा पथकाने आरोपी लोकसेवक श्री रामसिंह सुरजनाथसिंह बैस, वय 48 वर्ष, पोलीस हवालदार बक्कल नं. 1463, नेमणुक पोलीस स्टेषन, गोंदिया (ग्रा.), जि. गोदिया (वर्ग 3) यांना पकडले. त्यानंतर वेळ 14.55 वा पंच क्र. 1 यांच्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद करुन पुढील कार्यवाही करण्यात आली. याबाबतच्या सविस्तर नोंदी पोउपअधि श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. 1 मध्ये घेतल्या आहेत.तरी श्री रामसिंह सुरजनाथसिंह बैस, वय 48 वर्ष, पोलीस हवालदार बक्कल नं. 1463, नेमणुक पोलीस स्टेषन, गोंदिया (ग्रा.), जि. गोंदिया (वर्ग 3) यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून माझ्याविरुध्द पारीत झालेले हददपारीचे आदेश माझ्याकडे देवुन त्यामध्ये मला मदत करण्याकरीता माझ्याकडे रु. 15,000/- लाच रकमेची पंचासमक्ष मागणी करून ती लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेषिर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखित केली असुन मी वाचुन पाहीली माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** RANGNAHT TRAMBAK DHARBALE(SI (Sub-Inspector)) / DCPS14901000362RTDM8001B **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

पोलीस स्टेशन, गोंदिया (ग्रा.) जि. गोंदिया

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

17-01-2021

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची)

**Name** (नाव): ~~RANGNAHT TRAMBAK SHARB~~ NPC- Devanand Pardhi

**Rank**(पद): ~~SI (Sub-inspector)~~ 1506

**No.**(सं.): DCPS14901000362RTDM8001B

स्टे.डा.अंमलदार
पो.स्टे.गोंदिया ग्रामीण

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)